क्रमांक : १०५८८/क-३ (लेखा)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई- ४०००३२.
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२४.

**:: परिपत्रक ::**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अग्रिम-२०१८/प्र.क्र.३७/१८/विनियम, दिनांकित २३ ऑक्टोबर, २०१८ अन्वये दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्याचे ग्रेड वेतन ४८००/- (अक्षरी चार हजार आठशे फक्त) पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना रु. १२,५००/- (अक्षरी बारा हजार पाचशे फक्त) सण अग्रिम अनुज्ञेय आहे.

शासन परिपत्रकान्वये सण अग्रिम फक्त दिवाळी, रमझान ईद, ख्रिसमस, पारसी नववर्ष, संवत्सरी, रोश-होशना, वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती), स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, डॉ. आंबेडकर जयंती इ. सणासाठी अनुज्ञेय आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठीच अनुज्ञेय राहील.

माहे नोव्हेंबर मध्ये असलेल्या दिवाळी या सणासाठी ज्या कर्मचाऱ्यांना सण अग्रिम घ्यावयाचा असेल त्यांनी लेखा विभागात सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत. दिनांक ११ ऑक्टोंबर, २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सण अग्रिमासाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

उत्सव अग्रिम जास्तीत जास्त रु १२,५००/- (अक्षरी बारा हजार पाचशे फक्त) इतकाच अनुज्ञेय असून त्याची वसुली मसिक १० समान हप्त्यात माहे डिसेंबरमध्ये देय होणाऱ्या माहे नोव्हेंबर, २०२४ च्या मासिक वेतनापासून सुरु करण्यात येईल.

30/9/2024

**(स्वाती ताडफळे)**
**उप सचिव**
तथा नियंत्रण अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रतिलिपी :-**
या सचिवालयातील सर्व अराजपत्रित कर्मचारी व सर्व कक्ष.

D:\mandakini backup २८-३-२४\E drive\MANDAKINi PATIL-SHINDE-२२\diwali agrim\paripatrak.docxparipatrak

३५० 3/10/24

:: **नमुना** ::

नाव :

पदनाम :

ग्रेड वेतन :

दिनांक :

**प्रति,**

उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी,
क-३ लेखा शाखा,

विषय : दिवाळी उत्सव अग्रिमाबाबत.......

संदर्भ: शासन निर्णय क्र. अग्रिम-२०१८/प्र.क्र.३७/१८/विनियम, दिनांकित २३ ऑक्टोबर, २०१८.

**महोदय,**

मी विधानमंडळ सचिवालयात .................................या शाखेत कार्यरत असून मला संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सन २०२४ च्या दिवाळी सणासाठी उत्सव अग्रिम देण्यात यावा, हि विनंती.

आपला,

सही
(....नाव...)